आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 23/06/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन | पिंपरी चिंचवड व पुणे | पान 4 | अंक 138 | RNI - MAHMAR /2021/51259 | metrocity924@gmail.com

# ओमराजे निंबाळकरांसह सहा खासदारांचा शिंदे गटात प्रवेश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी घडामोड घडली असून, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (ठाकरे गट) पक्षाला मोठा धक्का बसला आहे. ठाकरे गटातील सहा खासदारांनी रविवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत अधिकृत प्रवेश केला.**




शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या खासदारांमध्ये धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर, परभणीचे खासदार संजय जाधव, हिंगोलीचे खासदार संजय देशमुख, अहमदनगरचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, मुंबईचे खासदार संजय दिना पाटील आणि नागेश पाटील आष्टीकर यांचा समावेश आहे.

या प्रवेशावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नव्याने पक्षात दाखल झालेल्या खासदारांचे स्वागत करत, "हे सर्व कट्टर शिवसैनिक आमच्या कुटुंबाचा भाग झाले आहेत. शिवसेना, धनुष्यबाण आणि बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्वाचे विचार जपण्यासाठी सुरु झालेल्या लढ्याचा हा दुसरा टप्पा आहे," असे सांगितले.

यावेळी विरोधकांनी धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यावर केलेल्या 'रीलस्टार' टीकेलाही शिंदे यांनी प्रत्युत्तर दिले. "ओमराजे हे केवळ रील स्टार नसून जनतेच्या मनातील 'रिअल स्टार' आहेत," असे म्हणत त्यांनी ओमराजे यांची पाठराखण केली.

22 जून 2022 रोजी झालेल्या शिवसेनेतील ऐतिहासिक बंडाची आठवण करुन देताना शिंदे म्हणाले की, "त्या वेळी सुरु झालेला लढा हा शिवसेना आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचे संरक्षण करण्यासाठी होता. आज या लढ्याचा पुढचा टप्पा सुरु झाला आहे."

या घडामोडीमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या पक्षांतराचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# राज्यसेवा पूर्व परीक्षेचा निकाल जाहीर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – 2026 मधील राज्यसेवा गट-अ व गट-ब परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. पूर्व परीक्षेतून एकूण 4103 उमेदवार मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. विशेष म्हणजे, पूर्व परीक्षेनंतर महिन्याभरातच निकाल जाहीर करुन एमपीएससीने वेगवान कारभाराचा प्रत्यय दिला आहे.**

एमपीएससीतर्फे महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – 2026 ही परीक्षा 31 मे रोजी घेण्यात आली. पूर्व परीक्षेतून मुख्य परीक्षेकरिता अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकासह नावांची यादी, गुणांची सीमारेषा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्याची माहिती एमपीएससीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली.

परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांच्या पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकीच मुख्य परीक्षेसाठी दिलेल्या मुदतीत अर्ज करुन परीक्षा शुल्क भरणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल.

मुख्य परीक्षेसंदर्भातील अधिसूचना स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या परीक्षेचा निकाल सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयात दाखल रिट यचिका, तसेच इतर आरक्षणासंदर्भात न्यायालयात, न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात आला आहे, असेही स्पष्ट करण्यात आले.



# पाणीपुरवठा विभागाच्या निविदेत 'रिंग'चा संशय?

## नगरसेवक संदीप वाघेरे यांची चौकशी व निविदा रद्द करण्याची मागणी

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : शहरातील विविध पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांवरील वितरण व्यवस्थेचे परिचालन व देखभाल-दुरुस्ती करण्यासाठी पाणीपुरवठा विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदा सूचना क्र. पाणीपुरवठा/HO/2/39/2026-2027 व पाणीपुरवठा/HO/3/2/2026-2027 संदर्भात गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. या निविदा प्रक्रियेतील अटी व शर्तींची सखोल चौकशी करून सदर निविदा रद्द करावी तसेच सुधारित अटींसह नव्याने निविदा प्रक्रिया राबवावी, अशी मागणी नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या वतीने करण्यात आली आहे.**






निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सदर निविदेतील अनेक अटींमध्ये विसंगती, तफावत तसेच स्पर्धाविरोधी स्वरूप आढळून येत आहे. काही अटी विशिष्ट ठेकेदार अथवा संस्थांना लाभदायक ठरतील अशा पद्धतीने तयार करण्यात आल्याचा प्रथमदर्शनी संशय व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे निविदा प्रक्रियेमध्ये अपेक्षित असलेली पारदर्शकता, समान संधी व निकोप स्पर्धा बाधित होण्याची शक्यता निर्माण झाली असून मर्यादित स्पर्धेमुळे 'रिंग' पद्धतीने निविदा प्रक्रिया पार पडण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

शासनाच्या धोरणानुसार सुशिक्षित बेरोजगार, स्वयंरोजगार गट, बेरोजगार सेवा सहकारी संस्था व लघु संस्थांना सार्वजनिक कामांमध्ये संधी मिळणे अपेक्षित असताना सदर निविदेमध्ये अशा घटकांच्या सहभागास अडथळा निर्माण करणाऱ्या जाचक अटींचा समावेश करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे अनेक पात्र संस्था निविदा प्रक्रियेपासून वंचित राहू शकतात, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, प्रत्यक्ष कामाचे स्वरूप हे व्हॉल्व ऑपरेशन, पाणीपुरवठा नियंत्रण, देखभाल व किरकोळ दुरुस्तीशी संबंधित असताना निविदेमध्ये "परिचालन" या व्यापक संज्ञेचा वापर करण्यात आला आहे. तसेच अकुशल कामगारांसाठीही अनुभव प्रमाणपत्राची सक्ती करण्यात आल्याने ही अट अव्यवहार्य व अन्यायकारक असल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे.

**नगरसेवक संदीप वाघेरे यांनी निवेदनाद्वारे**

**खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत:**

* निविदेतील अटी व शर्तींची स्वतंत्र व सखोल चौकशी करण्यात यावी.
* निविदा अटी विशिष्ट ठेकेदारांना लाभदायक ठरत आहेत का याची पडताळणी करण्यात यावी.
* सुशिक्षित बेरोजगार, स्वयंरोजगार गट व सेवा सहकारी संस्थांवर अन्याय करणाऱ्या अटी रद्द करण्यात याव्यात.
* अकुशल कामगारांसाठी अनुभव प्रमाणपत्राची अट व इतर अव्यवहार्य अटी वगळण्यात याव्यात.
* "परिचालन" ऐवजी "व्हॉल्व ऑपरेशन व देखभाल-दुरुस्ती" अनुभव असलेल्या संस्थांना पात्रता देण्यात यावी.
* देखभाल-दुरुस्ती व मजूर पुरवठा या कामांचा स्वतंत्र अनुभव ग्राह्य धरण्यात यावा.
* विद्यमान निविदा प्रक्रिया स्थगित अथवा रद्द करून सुधारित व स्पर्धात्मक अटींसह नव्याने निविदा प्रसिद्ध करण्यात यावी.

महानगरपालिकेच्या कामकाजात पारदर्शकता, समान संधी आणि निकोप स्पर्धा अबाधित राहावी तसेच सार्वजनिक निधीचा कार्यक्षम व न्याय्य वापर व्हावा, या उद्देशाने प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# अतिक्रमण निर्मूलन मोहिमेला गती

## अडीच महिन्यांत 820 ठिकाणी कारवाई

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागामार्फत शहरातील सार्वजनिक जागा, रस्ते, पदपथ, नाले तसेच अनधिकृत बांधकामांवर सातत्याने कारवाई करण्यात येत असून 1 एप्रिल 2026 ते 22 जून 2026 या कालावधीत शहरातील विविध भागांमध्ये एकूण 820 ठिकाणी अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली आहे.**



महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या मोहिमेत एकूण 451 अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली असून सुमारे 1 लाख 4 हजार 270.96 चौरस मीटर क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आले आहे. तसेच शहरातील विविध नाल्यांवरील 23 अतिक्रमणे हटविण्यात आली असून अंदाजे 839 चौरस मीटर क्षेत्र मोकळे करण्यात आले आहे. याशिवाय सार्वजनिक रस्ते, पदपथ आणि नागरिकांच्या वर्दळीच्या ठिकाणी अडथळा निर्माण करणाऱ्या फेरीवाले, पथारीवाले आणि इतर अतिक्रमणांवरही कारवाई करण्यात आली. या कालावधीत अशा एकूण 346 अतिक्रमणांचे निर्मूलन करण्यात आले.

क्षेत्रीय कार्यालयनिहाय पाहता सर्वाधिक 229 कारवाया क क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत करण्यात आल्या. त्याखालोखाल इ क्षेत्रीय कार्यालयात 103, ड क्षेत्रीय कार्यालयात 100, फ क्षेत्रीय कार्यालयात 95, ब क्षेत्रीय कार्यालयात 94, अ क्षेत्रीय कार्यालयात 84, ग क्षेत्रीय कार्यालयात 64 आणि ह क्षेत्रीय कार्यालयात 51 कारवाया करण्यात आल्या. शहरातील नाल्यांचा नैसर्गिक प्रवाह अबाधित ठेवणे, पावसाळ्यात पूरस्थिती टाळणे, सार्वजनिक रस्ते आणि पदपथ नागरिकांसाठी सुरक्षित व मोकळे ठेवणे तसेच अनधिकृत बांधकामांना आळा घालणे या उद्देशाने ही मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे.

महापालिका प्रशासनाच्या वतीने नागरिकांना अनधिकृत बांधकामे आणि सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणांना प्रोत्साहन न देण्याचे तसेच शहर स्वच्छ, सुरक्षित आणि सुव्यवस्थित ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 23/06/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते बॅडमिंटन कोर्टचे लोकार्पण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**चिंचवड : चिंचवडगाव येथील केशवनगर परिसरात आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या संकल्पनेतून आणि विकास निधीतून उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक बॅडमिंटन कोर्टचे लोकार्पण उत्साहात पार पडले. तसेच चिंचवडगावातील विविध विकासकामांचे भूमिपूजनही यावेळी करण्यात आले.**



केशवनगर येथे आयोजित कार्यक्रमात नगरसेवक सुरेश भोईर यांच्यासह अनेक भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्याने उभारण्यात आलेल्या बॅडमिंटन कोर्टमुळे केशवनगरसह परिसरातील क्रीडाप्रेमींना, विशेषतः युवक-युवतींना दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध होणार आहेत.

यावेळी बोलताना आमदार शंकरभाऊ जगताप म्हणाले की, "या बॅडमिंटन कोर्टमुळे केवळ युवकांनाच नव्हे, तर ज्येष्ठ नागरिकांसह समाजातील सर्व स्तरांतील नागरिकांना खेळाचा आनंद घेता येईल. क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी अशा सुविधा उभारणे आवश्यक आहे."दरम्यान, चिंचवडगावातील लोंढेनगर येथील समाज मंदिरासह विविध विकासकामांचे भूमिपूजनही आमदार जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये संरक्षण भिंत, ड्रेनेज पाईपलाईन आणि परिसर सुशोभीकरणाच्या कामांचा समावेश आहे.

"चिंचवडगावच्या सर्वांगीण विकासासाठी मी कटिबद्ध असून, नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि क्रीडा सुविधांना प्राधान्य देऊन परिसराचा कायापालट करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे," अशी ग्वाही आमदार जगताप यांनी यावेळी दिली.कार्यक्रमास उपस्थित नागरिकांनी परिसरात सुरु असलेल्या विकासकामांबद्दल समाधान व्यक्त करत आमदार शंकरभाऊ जगताप यांचे आभार मानले.

# राष्ट्रीय श्रमिक आघाडीचा भव्य मेळावा उत्साहात

## कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी अध्यक्ष कामगारनेते यशवंतभाऊ भोसले कंबर कसून मैदानात!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील संघटनेच्या सभासद कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आणि त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी, आज पिंपरीतील संत तुकाराम नगर येथे 'राष्ट्रीय श्रमिक आघाडी'च्या वतीने एका भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.**



या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष तथा कामगारनेते यशवंतभाऊ भोसले उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना अध्यक्ष यशवंतभाऊ भोसले यांनी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

त्यांनी सांगितले की, "गेल्या 18 वर्षांपासून आमची संघटना महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या न्यायिक हक्कासाठी आम्ही पूर्ण ताकतीने काम करत आहोत.

कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक समस्येवर सकारात्मक मार्ग काढण्यासाठी संघटना सदैव तत्पर आहे." मेळाव्यात उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या समस्या मांडल्या, ज्यावर यशवंतभाऊ भोसले यांनी सविस्तर चर्चा करून त्या सोडवण्याचे आश्वासन दिले.

कर्मचाऱ्यांच्या मेहनतीचे कौतुक करत, आगामी काळातही त्यांच्या प्रश्नांना प्राधान्याने न्याय मिळवून दिला जाईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी मोठ्या संख्येने महानगरपालिकेतील सभासद कर्मचारी उपस्थित होते. शिस्तबद्ध पद्धतीने पार पडलेल्या या मेळाव्यात कर्मचाऱ्यांच्या एकजुटीचे दर्शन घडले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 23/06/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# अशुद्ध पाणीपुरवठा करणाऱ्या टँकर चालकांवर कारवाई करा - खा. श्रीरंग बारणे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी-चिंचवड शहरात टँकरने मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा केला जातो. टँकर चालक हे पाणी कोठून घेतात, ते पिण्यायोग्य आहे का याची चौकशी करावी. पैसे जास्त घेऊन सोसायटीधारकांना आर्थिक बुर्दंड टाकला जातो. सोसायटीधारकांची लूट थांबवावी. त्यासाठी टँकर चालकांवर निर्बंध आणावेत. त्यांची नोंद ठेवावी. स्वच्छ पाणी न दिल्यास टँकर चालकांवर कारवाई करण्याची सूचना शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका प्रशासनाला केली आहे. तसेच इतर विकास कामांबाबत काटकसर करावी. पाणीपुरवठ्याच्या कामांवर भर देऊन ही कामे तत्काळ पूर्ण करावीत. याबाबत आयुक्त आणि महापौरांशीही चर्चा करणार असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.**



शहरात चार दिवसांपासून पाणी कपात करण्यात आली. विस्कळीत पाणीपुरवठ्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाल्याने खासदार बारणे यांनी सोमवारी महापालिका अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली. अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, नागसेविक सुलभा उबाळे, ऐश्वर्या तरस, नगरसेवक निलेश तरस, राजेंद्र तरस, पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता महेश बरिदे, विजयसिंह भोसले, सुनिल अहिरे, कनिष्ठ अभियंता अनिश ओक उपस्थित होते. दरम्यान, खासदार श्रीरंग बारणे यांनी गेल्या आठ वर्षात पवना धरणातील एक लाख क्युबिक मीटर गाळ काढल्याने दीड महिना पुरेल एवढा पाणीसाठा उपलब्ध झाला. एक टीएसी पाणीसाठा वाढला आहे. त्यामुळे उन्हाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई जाणवली नाही. शासनाची कोणतीही मदत न घेता खासदार बारणे यांनी लोकसहभागातून हा गाळ काढला. अन्यथा गंभीर पाणी टंचाईला सामोरे जावे लागले असते.

खासदार बारणे म्हणाले, कमी दाबाने, अस्वच्छ पाणीपुरवठ्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. समान पाणीपुरवठा होत नाही. काही ठिकाणी जास्त, काही ठिकाणी कमी तर काही ठिकाणी पाणी येतच नाही. पाणी समान वाटपासाठी स्काडा प्रणाली बसविली. मीटर बदलले. जलवाहिनी बदललली. पाण्याच्या टाक्या सर्वाधिक उभारल्या. 30 टक्के पाणी गळती होत आहे. अनधिकृतपणे नळजोड घेतले जातात. ते रोखण्यात प्रशासनाला अपयश आले आहे. नियोजनशून्य कारभारामुळे पाणी समस्या कायम आहे. प्रशासन उशिरा जागे झाले आहे. पाणी काटकसरीचे नियोजन अगोदरच करणे अपेक्षित होते. पाणी बचतीचे वर्षभर नियोजन करावे. स्वच्छ पाणीपुरवठ्यासाठी आत्तापासूनच तयारी करावी. महापालिका अशुद्ध पाणी उपसा करित असलेला नदी पात्राचा परिसर अतिशय अस्वच्छ आहे. तेथील नदीपात्र स्वचछ करावे. मुळशी धरणातून अतिरिक्त सात टीएमसी पाणी आणण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा.

शहरातील 494 सोसायट्यांपैकी 369 सोसायट्यांमधील एसटीपी चालू आहेत. 125 सोसायट्यांमधील एसटीपी बंद आहेत. सोसायट्यांमधील एसटीपी चालू आहेत की नाही यावर निगराणी ठेवावी. एसटीपीतील पाणी वाहने धुने, उद्यानासाठी वापरण्याकरिता नागरिकांना प्रोत्साहित करावे. जुन्या सोसायट्यांना एसटीपी उभारणे शक्य नाही. तिथे महापालिकेने लहान एसीटीपी उभारण्याचा प्रयत्न करावा, अशी सूचनाही खासदार बारणे यांनी केली. पवना बंदिस्त जलवाहिनीची कोट्यवधी रुपये खर्च करुन टाकलेली पाईपलाईन किवळेतील कैवल्य सोसायटी आणि सेंटीयोगा या दोन सोसायट्यांनी बांधकाम परवानगी विभागाच्या संगनमताने काढली आहे.

ही बाब अतिशय गंभीर आहे. त्यामुळे महापालिकेचे कोट्यवधीचे रुपयांचे नुकसान झाले आहे. यामध्ये कोण आहे, त्याचा शोध घ्यावा आणि कठोर कारवाई करावी अशी सूचना खासदार बारणे यांनी केली.

# मलेशिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी शहराच्या २१ खेळाडूंची भारतीय संघात निवड

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी :
जालना येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीयि सलंबम अजिंक्यपद स्पर्धेमध्ये भारताच्या
राष्ट्रीय संघाची निवड करण्यात आली असून 1 व 2 ऑगस्ट 2026 रोजी मलेशिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीयि सलंबम अजिंक्यपद स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघामध्ये पिंपरी चिंचवड शहरातील तब्बल 21 खेळाडूंची निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशामुळे शहराच्या क्रीडा क्षेत्रातील नावलौकिकात आणखी भर पडली आहे.



भारतीय संघामध्ये निवड झालेल्या खेळाडूंमध्ये आदश केंकंड, आदित्य टेळेकर, आनंद गायकवाड, अनन्या हेलावे, अथव कर्हाडे, देवराज भुटेकर, हर्षल धाने, काशिनाथ हेवळे, प्रिया सैनी, राज वायकोळे, ऋतुजा कुलकर्णी, साक्षी सैनी, श्रेया दांडे, सिद्धाथ चौधरी, सूरज बांगर, सूरज टाळेकर, वैदेही नवले, वेदांत तापकीर, विश्वजीत पवार, यश बलगुडे आणि संजय बनसोडे यांचा समावेश आहे.

सिलंबम ही भारतातील प्राचीन पारंपरिक युद्धकला असूनि तच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडू सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करत आहेत. पिंपरी चिंचवडमधील या खेळाडूंनी कठोर परिश्रम, शिस्त, जिद्द आणि सातत्यपूण र्सरावाच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर यशि मळवत भारतीय संघात स्थानि मळविले आहे.
या निवडीमुळे केवळ खेळाडूंचाच नव्हे तरि पंपरी-चिंचवड शहराचाही गौरव झाला असून पारंपरिक भारतीय क्रीडा आणि युद्धकलेच्या क्षेत्रातील शहराचे योगदान अधोरेखित झाले आहे. आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत हे खेळाडू देशाचे प्रतिनिधित्व करत उत्कृष्ट कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968